**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १७१/२०१३ मधील</u>**
**<u>नि.८५ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६/१ तर्फे कैफियत व जबाब दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून कैफियत आणि जबाब दाखल करणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.६/१ यांना कावीळ झाल्यामुळे अशक्तपणा आलेला होता. त्यामुळे त्यांना दाव्यास व मनाईहुकूमाचे अर्जास मुदतीत जबाब देणेसाठी आवश्यक ती माहिती व कागदपत्रे मिळविणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांना वकिलांची भेट देखील घेणे शक्य झाले नसल्यामुळे त्यांना कैफियत व जबाब मुदतीत दाखल करता आले नाही. करिता सदरील कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत व जबाब दाखल करुन घेणेबाबत विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही.

४. अर्जातील कथने पाहता, प्रतिवादी क्र.६/१ यांना त्यांची कैफियत दाखल करुन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळाल्यास दाव्याची चौकशी होवून दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालवण्यास मदत होणार आहे. अशी संधी त्यांना न दिल्यास त्यांचे कधीही व कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. याउलट, अर्ज मंजूर केल्यास वादीला कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केला असल्याने प्रतिवादींवर खर्च बसवता येवू शकतो. प्रतिवादी क्र.६/१ तर्फे अर्जासोबत कैफियत व जबाब दाखल केले

आहे. करिता आदेश —

**<u>आदेश</u>**

१. अर्ज रुपये ३,०००/— च्या खर्चावर मंजूर.

२. खर्चाची रक्कम दिल्यानंतर, प्रतिवादी क्र. ६/१ यांना कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांना कैफियत व जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

Digitally signed by Shraddha Jitendra Dolare
Date: 2021.02.10 16:53:39 +05'30'

कर्जत ( श्र.जि. डोलारे )
दिनांक : ०८/०२/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत
जिल्हा—रायगड.